**आदेश**

जा.क्र. ९६९५/कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक - २२/१२/२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दि.२२/१२/२०२० ते दिनांक ०५/०१/२०२१ रोजी पर्यंत दररोज रात्रौ २३/०० वा.ते पहाटे ०६/०० वा.दरम्यान संचारास मनाई आदेश**

(१) ज्याअर्थी, कोरोना विषाणुंचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या सुधारित निर्देशानुसार (महाराष्ट्र राज्य महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन, मंत्रालय, मुंबई - संदर्भ क्र. DMU/२०२०/CR.92/DisM-1 दि.२७/११/२०२० अन्वये संपुर्ण राज्यात दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यत लॉकडाऊनची कालमर्यादा वाढवण्यासाठी मार्गदर्शक सुचना दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजी जारी करण्यात आल्या आहेत. - संदर्भ क्र. DMU/२०२०/CR.92/DisM-1 दि.२१/१२/२०२० अन्वये राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त निर्बंध लागु करण्यात आले आहेत.

(२) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१ मध्य उप-विभाग यांचे कडील अधिसुचना क्रमांक ३ मधील पान १९७३ (II -१९७४) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन नियुक्त करु क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चा क्र.एमएससी-१२७४/व्ही-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता न कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

(३) त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये दि.२२/१२/२०२० ते दिनांक ०५/०१/२०२१ रोजी पर्यंत दररोज रात्रौ २३/०० वा.ते दुस-या दिवशी पहाटे ०६/०० वा.दरम्यान संचारबंदीचे आदेश लागू करत आहे सदर आदेशात महाराष्ट्र राज्य शासन व महानगरपालिका, पुणे यांनी वेळोवेळी पारीत केलेल्या आदेशान्वये देण्यात आलेल्या अत्यावश्यक / जीवनावश्यक सेवा तसेच वस्तु याबाबतच्या सवलती समाविष्ट असतील.

(४) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी व प्रचलित कायदयांन्वये शिक्षेस पात्र राहील.

(५) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.२२/१२/२०२० रोजी दिलेला आहे.

22/12/2020

(डॉ. रवींद्र शिसवे)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २२/१२/२०२०**

पोलीस सह आयुक्त
पुणे शहर

Scanned with CamScanner